महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५,६००-३९,१०० + ग्रेड पे रुपये ५,४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश, क्रमांकः न्यायिक- २०१७/प्र.क्र. १६७/सेवा-३
१० वा मजला, संकुल इमारत, गो.ते. रुग्णालय, संकुल इमारत,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक : १७ मार्च, २०१८

वाचा : १) शासन आदेश, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः मवैअ २०१५/प्र.क्र.५७१/सेवा ३, दिनांक ३१.०५.२०१६

२) मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.२०.०१.२०१७ चे आदेश

शासन आदेश :-

डॉ. चंद्रशिल शांतवन ठोकळ यांची दि.३१.०५.२०१६ च्या आदेशान्वये नागरी कृष्ठरोग पथक, अहमदनगर येथून प्राथमीक आरोग्य केंद्र मांजरी ता. राहुरी जि. अहमदनगर येथे बदली झाली होती. सदर बदली आदेशाविरुध्द डॉ. ठोकळ यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे मुळ अर्ज क्र.४४०/२०१६ दाखल केला. त्यावर संचालनालयाच्या वतीने डॉ. ठोकळ यांना तालुका अरोग्य अधिकारी, राहुरी या पदावर सामावून घेण्यात येईल असे न्यायाधिकरणास शपथपत्र दाखल करण्यात आले. त्याअनुषंगाने आदेश निर्गमित करावेत असा निर्णय मा. न्यायाधिकरणाने दि.२०.०१.२०१७ रोजी दिला. त्यानुसार महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५,६००-३९,१०० + ग्रेड वेतन रुपये ५,४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या महाराष्ट्र कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व कलम ४ (५) च्या

तरतुदीनूसार खालील विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या प्रमाणे नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीने व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने त्यांच्या प्रशासकीय बदल्या करण्यात येत आहेत.

अ.क्र.	वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव	सध्या कार्यरत ठिकाण	बदलीचे ठिकाण
१.	२.	३.	४.
१	डॉ चंद्रशील शां. ठोकळ	प्रा. आ. केंद्र मांजरी जि. अहमदनगर	ता. आ. अ. राहुरी जि. अहमदनगर
२	डॉ संतोष शंकरराव विधाते	ता. आ. अ. राहुरी जि. अहमदनगर	ता. आ. अ. कोपरगाव जि. अहमदनगर

१) बदली करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांच्या बदली झालेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्याकरीता पर्यवेक्षकीय अधिका-यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे आणि संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर होऊन, त्याबाबतचा रुजू अहवाल संबंधित उप संचालक, आरोग्य सेवा (परिमंडळ); संचालक, आरोग्य सेवा, मुंबई आणि शासनास सादर करावा.

२) बदली झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी, त्यांना कार्यमुक्त केल्यानंतर अनुज्ञेय पदग्रहण अवधीत नविन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे. जे वैद्यकीय अधिकारी या कालमर्यादेचे पालन करणार नाहीत आणि पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता परस्पर गैरहजर राहतील, अशा अधिकाऱ्यांची अनुपस्थिती **“अनधिकृत गैरहजरी”** म्हणून समजण्यात येईल व पर्यायाने त्यांच्या सेवेत खंड पडण्याची शक्यता नाकारता येत नाही याची जाणीव सर्व संबंधीतांना करुन देण्यात येत आहे.

३) आरोग्य सेवा संचालनालयाने जे वैद्यकीय अधिकारी त्यांचे पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणार नाहीत त्यांचे विरुध्द वेळीच कारवाई सुरु करावी. जेणेकरुन वैद्यकीय अधिकारी वेळीच नविन पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होतील. सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत संबंधीत अधिका-यांना कार्यमुक्त करण्याची जबाबदारी पर्यवेक्षकीय अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा (परिमंडळ) यांची राहील.

४) या बाबी विचारात घेऊन या प्रकरणी वेळोवेळी शासनास अवगत करावे व संबंधित परिमंडळाचे उप संचालक, आरोग्य सेवा यांनी रिक्त पदाच्या अद्ययावत तपशीलासह अनुपालन अहवाल संचालक आरोग्य सेवा यांच्या मार्फत शासनास सादर करावा.

५) सदर आदेश महाराष्ट्र कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) आणि ४ (५) च्या तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१७१०५०४१२७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Hanmantrao Bhosale

Digitally signed by Satish Hanmantrao Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4c0ff0607bc973d9663171bd9b8a9b9ab8cb569b155f9653d1180a4549819299, cn=Satish Hanmantrao Bhosale
Date: 2018.03.17 11:33:50 +05'30'

(स. ह. भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र १ /२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर.
२) आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई.
३) संचालक आरोग्य सेवा, मुंबई.
४) उपसंचालक, आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक.
५) जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर.
७) जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर.
८) संबधित अधिकारी (उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, नाशिक यांचे मार्फत).
९) निवडनस्ती (सेवा-३)